**रे.के.नं. ६६/२०२३**
**नि.क्र.५७/क च्या पुढे**

अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांचा जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - शंकर शिवाजी होनमाने,

वय - ४२ वर्षे

व्यवसाय - सहाय्यक पोलीस निरीक्षक,

राहणार - रबाळे पोलीस ठाणे, नवी मुंबई.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता पी. बी. देशमाने यांच्याद्वारे**

१. दिनांक ११.१०.२०२१ रोजी मी उरण पोलीस ठाणे येथे सहाय्यक पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत होतो. या प्रकरणातील गुन्ह्याची नोंद एपीआय श्री. गवते यांनी केली आहे. वरिष्ठांच्या आदेशाने सदर गुन्ह्याचा तपास माझेकडे सोपविण्यात आला. तपासकामी मला फिर्याद व प्रथम खबर हे दस्तएवज प्राप्त झाले होते. तपासाअंतर्गत मी घटनास्थळावर जाऊन दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा केला होता. आता मला तो पंचनामा दाखवला. त्यावर माझी व दोन पंचांची सही असून त्यातील मजकूर बरोबर आहे करीता सदर पंचनाम्याला **निशाणी क्र. P3 PW2** देण्यात येतो. त्यानंतर मी साक्षीदारांचे जबाब नोंदवले होते. त्यानंतर पुढील तपास दुसऱ्या तपास अधिकाऱ्यांकडे सोपवला होता. आजरोजी काही आरोपी न्यायालयात हजर आहेत.

**उलटतपास आरोपी क्र. १ व ५ ते ८ तर्फे वकिल श्री. निनाद नाईक यांच्यामार्फत...**

२. हे म्हणणे खरे आहे की, गुन्हा दाखल झाल्यावर दोषारोपपत्र निर्धारित

वेळेत दाखल करावे लागते. हे म्हणणे खरे आहे की, दोषारोपपत्रात नमुद केलेल्या कलमास जी शिक्षा असेल त्या आधारे निर्धारीत वेळेत दोषारोपपत्र सादर करावे लागते. हे मला सांगता येत नाही की, महाराष्ट्र पोलीस कायद्याचे कलम ३७ (३) च्या उल्लंघनासाठी शिक्षापात्र असलेले कलम १३५ या गुन्ह्यासाठी केवळ २०००/- रूपये दंडाची शिक्षा आहे. हे म्हणणे खरे आहे की, भादवि चे कलम १८८ अंतर्गत शिक्षापात्र गुन्ह्यासाठी ६ महिन्याच्या कारावासाची शिक्षा आहे. हे म्हणणे खरे आहे की, उरण मोरा रस्ता हा उत्तर दक्षिण असा आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळाच्या पुर्वेस शिवसेना शाखा नाही. हे म्हणणे खरे आहे की, तो परिसर वर्दळीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, तेथे आजूबाजूला दुकाने आहेत. हे म्हणणे खरे नाही की, तेथे जवळच हनुमानाचे मंदिर आहे. हे म्हणणे खरे नाही की, मनाई आदेशाची प्रसिद्धी केलेली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, पंचनाम्यात घटनास्थळाच्या चर्तु:सीमा नमुद करणे आवश्यक आहे. हे म्हणणे खरे आहे की, निशाणी क्र. P3 PW2 वरील पंचनाम्यात चर्तु:सीमा नमुद नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, देवा धाडवे व साई मढवी हे आम्हा पोलीसांचे नियमित पंच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी घटनास्थळाचा पंचनामा केल्याचे व साक्षीदारांचे जबाब नोंदवल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी आरोपी तेथे हजर नव्हते.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ तर्फे वकिल श्री. किशोर ठाकुर यांच्यामार्फत...</u>**

३. हे म्हणणे खरे आहे की, गणपती देवस्थान हे उरण येथील मुख्य बाजारपेठेचे ठिकाण आहे. हे म्हणणे खरे आहे की, कोणताही स्वतंत्र साक्षीदार हा साक्ष देण्यासाठी मिळून आला नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादी व साक्षीदार हे पोलीस कर्मचारी आहेत. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्यात नमुद दोन्ही साक्षीदार उरण

येथील न्यायालयात नेहमी साक्ष देण्यासाठी येत असतात. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, पोलीस अधिक्षक यांचे प्रतिबंधात्मक आदेश घटनेच्या वेळी लागू नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा पोलीस ठाण्यात तयार करून त्यावर पंचांच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे नाही की, माझे तपासात मी चुकीचा तपास केला.

**उलटतपास आरोपी क्र. ४ तर्फे वकिल श्री. अनुराग ठाकुर यांनी इतर आरोपींतर्फे घेतलेला इतर उलटतपास स्वीकारून उर्वरित उलटतपास**

४. जमावबंदीच्या आदेशाचे पंचनामे केल्याचे माझे तपासात आढळून आले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, जमावबंदीचा आदेश प्रसिद्ध झाला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, विरोधी पक्षातील व्यक्तींविरूद्ध तक्रार दाखल करावी म्हणुन सदर प्रकरण दाखल केले आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी कोणतीही वस्तु जप्त केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासातील मजकूर खोटा सांगत आहे.

**उलटतपास आरोपी क्र. ९ तर्फे वकिल श्री. जितेंद्र कातरणे यांनी आरोपी क्र. ३ तर्फे घेतलेला उलटतपास स्वीकारला.**

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत

**सही/-**

**(एस.पी. वानखडे )**

**उरण,**

**दिनांक – २०/०४/२०२६**

**न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,न्यायालय क्र.१ उरण**